# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १७.०९.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) पाचपावली पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस शस्त्रासह अटक. ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १६.०९.२०२६ चे १७.५० वा. ते १८.३० वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, मोतीबाग रेल्वे क्रॉसिंग जवळील भोला हायस्कुल शाळेमागे एक इसम सुझुकी कंपनीच्या ॲक्सेस मोपेड क्र. एमएच ४९ सीव्ही ६६७६ ने संशयीतरित्या फिरतांना दिसुन आल्याने, त्यास थांबवण्याचा प्रयत्न केला असता, तो पळू लागला. त्याचा पाठलाग करुन ताब्यात घेवुन, पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव हर्षल उर्फ हरशु मुकेश तभाने वय १९ वर्षे रा. हुडको कॉलनी, एलआयजी क्वॉर्टर क्र. ५८४, बिल्डींग क्र. ४९, शिवमंदीर जवळ, नारा रोड, जरीपटका, नागपूर असे सांगितले. त्याची व वाहनाची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन एक स्टील पात्याचा चाकु कि. १५००/—रू. चा मिळून आला. आरोपीस त्याचे ताब्यातील वाहन संबंधाने कागदपत्रे मागितली असता, त्याने कोणतेही कागदपत्रे सादर न करता, नमुद वाहन चोरी केल्याचे सांगितले. गुन्हे अभिलेख तपासला असता, नमुद वाहन हे पोलीस ठाणे जरीपटका येथे दाखल एका वाहनचोरीचे गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने नमुद वाहनाव्यतिरिक्त पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत इतर ठिकाणी एक होंडा ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ सीटी ६५१० चोरी केल्याचे सांगीतल्याने, त्याने एकुण दोन वाहनचोरीचे गुन्हयांची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चाकु, दोन वाहने असा एकुण १,५६,५००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा अभिलेखावरील गुन्हेगार असून त्याचेविरुध्द पोलीस ठाणे पाचपावली, जरीपटका, हिंगणा, गिट्टीखदान, हुडकेश्वर, सक्करदरा येथे वाहनचोरी व घरफोडीचे गुन्हे दाखल असल्याचे निदर्शनास आले. आरोपीकडून पोलीस ठाणे जरीपटका अंतर्गत दोन वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. आरोपीविरुध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे कलम ४,२५ भाहका सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करुन, आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभा) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिरुध्द पुरी, दुपोनि. विवेक पडघान, सपोनि. सचिन भोंडे, पोहवा. विनोद समदुरे, फहीम खान, प्रविण वावरकर, पोअं. गगन यादव, रुपेश सहारे व शहनवाज मिर्झा यांनी केली.



**२) पाचपावली पोलीसांची कामगीरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०६.०९.२०२६ चे ०८.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी पकंज पितांबर कुकडे वय ३६ वर्ष रा. प्रेमनगर, नारायणपेठ, गली क्र. ५, शांतीनगर, नागपूर हे दारु पिण्याचे सवईचे असल्याने पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत जैस्वाल देशी दारु दुकानासमोर, मेहंदीबाग पावर हाऊस चौक येथे गेले असता, तेथे एका पल्सर गाडीने २५ ते ३० वर्षीय दोन अनोळखी इसमांनी येवून फिर्यादीस विनाकारण अश्लिल शिवीगाळ करुन, त्यातील एकाने बंदुकीसारखे वस्तुचा धाक दाखवून व हातबुक्कीने मारहाण करुन, फिर्यादीचे खिशातील रोख ५०० रुपये जबरीने काढून घेऊन, तेथुन त्यांचे वाहनाने पळून गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे कलम ३०९(४),२९६,११५(२),३५१(३),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात पाचपावली पोलीसांचे तपास पथकाने तांत्रिक तपास करुन आरोपींना निष्पन्न केले. आरोपी क्र. १) सोमेश प्रकाश मरसकोल्हे वय ३० वर्षे रा. रानी दुर्गावती चौक, विलास किराणा दुकानाजवळ, संजय गांधी नगर, यशोधरानगर, नागपूर २) सागर श्रावण येटी वय ३२ वर्ष रा. वार्ड क्र. ७, प्रशांत पिंपळशेंडे यांचे घरी किरायाने, बुटीबोरी, नागपूर यांना ताब्यात घेऊन, गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा संगनमताने केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींना अटक करुन, त्यांची मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त केली. पोलीस कोठडी दरम्यान आरोपी क्र. १ याचेकडून फिर्यादीचे हिसकावलेले रोख ५०० रुपये, गुन्हयात वापरलेली बंदुकीसारखी दिसणारी एअरगन तसेच, बजाज पल्सर दुचाकी क्र. एमएच ४० बीझेड ७१०९ असा एकुण ६१,५००/—रु. चा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमुद दोन्ही आरोपी अभिलेखावरील गुन्हेगार असून पोलीस ठाणे पाचपावली व यशोधरानगर येथे त्यांचेविरुध्द गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभा) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. अनिरुध्द पुरी, दुपोनि. विवेक पडघान, सपोनि. सचिन भोंडे, प्रमोद सोनवणे, पोउपनि. राजेंद्र जाधव, पोहवा. विनोद समदुरे, फहीम खान, प्रविण वावरकर, पोअं. गगन यादव, रुपेश सहारे व शहनवाज मिर्झा यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे बेलतरोडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १६.०९.२०२६ चे २२.४० वा. चे पुर्वी, फिर्यादी रोशन नंदुलाल जैस्वाल वय ३६ वर्ष रा. प्लॉट क्र. ६५५, साईनगर, शांतीनगर, नागपूर यांचे वडील नामे नंदुलाल कवडुलाल जैस्वाल वय ६० वर्ष हे त्यांचे बजाज अ‍ॅपे तीनचाकी मालवाहु वाहन क्र. एमएच ४९ डी २५४६ ने बुटीबोरी वरुन घरी परत येत असतांना, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्‌दीत, नागपुर—जबलपुर हायवेवरील अमरावतीकडे जाणारे रोडचे कटींगजवळ कोणीतरी अज्ञात चारचाकी वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांचे अ‍ॅपे वाहनास धडक देवुन, त्यांना गंभीर जखमी करुन, घटनास्थळावरुन पळुन गेला. त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, त्यांना डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

यावप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे कोतवाली</u> :—** संजीव श्रवणलाल शाहु वय ५७ वर्षे रा. जुनी शुक्रवारी, वंजारी आटा चक्कीजवळ, पंतग गल्ली, कोतवाली, नागपूर हे दिनांक १५.०९.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे कोतवाली हद्‌दीतुन बेपत्ता झाले आहेत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट ५ इंच, डोळे—काळे, केस—काळे पांढरे, समोरुन टक्कल पडलेले आहे. भाषा—हिंदी बोलतात. ओळख— डावे गालावर मस्सा आहे.



संजीव

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**